सत्यमेव जयते
महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

**पोलीस अधीक्षक कार्यालय, सातारा.**
९३, मल्हार पेठ, सातारा.
दुरध्वनी क्रमांक ०२१६२-२३२२२५
ई-मेल आय डी- sp.satara@mahapolice.gov.in

पुण्यश्लोक ३००

जा.क्र/जिवानिशा/अधिसुचना /२५७/२०२६ पोलीस अधीक्षक कार्यालय सातारा दिनांक - २९/०६/२०२६

# अधिसुचना

वाठार पोलीस ठाणे हद्दीतील सातारा ते लोणंद या महामार्गावरील मौजे देऊर येथील रेल्वे गेट क्र. ४७ किमी १२२/८-९ हे रेल्वे रुळाच्या दुरुस्तीसाठी व निरीक्षणासाठी २ दिवस बंद ठेवुन सातारा ते लोणंद या महामार्गावरील वाहतुक पर्यायी मार्गाने वळविणेबाबत वरिष्ठ सेक्शन इंजिनिअर (रेलपथ) मध्य रेल्वे वाठार यांनी विनंती केली आहे. त्यामुळे सातारा ते लोणंद या महामार्गावरील वाहतुकीचे खलीलप्रमाणे नियोजन होणे आवश्यक आहे. त्याबाबतची अधिसुचना प्रसिध्द करण्यात येत आहे.

मी निखील पिंगळे भापोसे, पोलीस अधीक्षक सातारा मला महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम ३४ अन्वये प्राप्त असलेल्या अधिकारान्वये वाठार पोलीस ठाणे हद्दीतुन जाणारा सातारा ते लोणंद या राष्ट्रीय महामार्गाच्या वाहतुक मार्गात बदल करुन वाहतुक सुरळीत राहणेकरीता दि.०१/०७/२०२६ रोजीचे ०७.०० ते दि.०२/०७/२०२६ रोजचे १९.०० वा. पर्यत ०२ दिवसासाठी खालील अधिसुचना पारित करीत आहे.

## वाहनांच्या वाहतुक मार्गातील बदलाबाबत
## वाहतुक मार्गात खालीलप्रमाणे बदल करण्यात आला आहे.

१. फलटण /लोणंद वरुन साताराकडे येणारी अवजड वाहने ही लोणंद वरुन खंडाळा/शिरवळ मार्गे पुणे बेंगलोर महामार्गावरुन साताराकडे जातील.

२. साताऱ्याकडुन वाढे फाटा मार्गे लोणंद/फलटण कडे जाणारी अवजड वाहने ही वाढे फाट्यावरुन न वळता सरळ पुणे बेंगलोर महामार्गावरुन खंडाळा/शिरवळ मार्गे लोणंद/फलटण कडे जातील.

३. फलटण/लोणंद वरुन साताराकडे येणारी सर्व प्रकारची हलकी वाहने ही आदर्की फाटा (फौजी ढाबा) येथुन वाठार/तडवळे सं.वा. वरुन पिंपोडे बु. - दहिगाव - देऊर येथुन सातारा/कोरेगाव कडे जातील.

४. सातारा/कोरेगाव वरुन लोणंद कडे जाणारी सर्व प्रकारची हलकी वाहने ही, देऊर वरुन दहिगाव - पिंपोडे बु. - वाठार/ तडवळे सं.वा. मार्गे लोणंद/फलटण कडे जातील.

५. शाळा व महाविद्यालय विद्यार्थ्यांची गैरसोय होवु नये या करीता महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ कडील रा.प.बसेस यांना देऊर वरुन दहिगाव - पिंपोडे बु. - वाठार/ तडवळे सं.वा. या मार्गावरुन येण्यासाठी व जाण्यासाठी परवानगी देण्यात आली आहे.

Scanned with CamScanner

६. मौजे देऊर येथील रेल्वे गेट क्रासिंग हा रोड सर्व प्रकारच्या वाहतुकीसाठी बंद राहील.

तरी वरील वाहतुक ज्या ज्या ठिकाणावरुन वळविण्यात आली आहे. अशा सर्व ठिकाणी दिशा दर्शक फलक व त्याठिकाणी पोलीस बंदोबस्त नेमण्यात आला आहे. वरील वाहतुक मार्गात केलेल्या बदलासाठी सर्व नागरीकांनी व वाहन चालकांनी नोंद घेवुन पोलीस दलास सहकार्य करावे.

सदरची अधिसुचना माझ्या स्वाक्षरी व शिक्यानिशी दि.२९/०६/२०२६ रोजी जारी करण्यात आली आहे.

SUPDT. OF POLICE SATARA

(निखील पिंगळे) भापोसे
पोलीस अधीक्षक सातारा

ठिकाण - सातारा
दिनांक - २९/०६/२०२६

प्रति,

१) मुद्रण व्यवस्थापक, कारागृह मुद्रणालय, पुणे
२/- महाराष्ट्र राजपत्रकामध्ये आदेश प्रसिध्द करुन प्रति रेकॉर्डकरता पाठविणेबाबत.
२) महाव्यवस्थपक (टनेल विभाग) महारेल पुणे.
३) जिल्हा माहीती अधिकारी, सातारा यांना वृत्तपत्रात प्रसिध्दी करण्यासाठी.
४) संपादक/प्रतिनिधी, दैनिक ऐक्य, पुढारी, लोकसत्ता,लोकमत तरुण भारत, सकाळ, सामना, ग्रामोध्दार,पुण्यनगरी, महाराष्ट्र टाईम्स, तिरंगा, मुक्तागीरी, जिव्हाळा यांना वृत्तपत्रात प्रसिध्द करणेसाठी
५) पोलीस अधीक्षक, पुणे ग्रामीण, सोलापूर ग्रामीण, सांगली, कोल्हापूर.
२/- सदर आदेशाची प्रसिध्दी आपल्या कार्यक्षेत्रातील स्थानिक वृत्तपत्रामध्ये करणेस विनंती.
६) सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा जिल्हा.
७) सर्व पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी सातारा जिल्हा.

प्रत माहीतीसाठी सादर

१) मा.विशेष पोलीस महानिरीक्षक कोल्हापुर परिक्षेत्र कोल्हापुर.
२) मा.जिल्हाधिकारी सातारा.
३) पोलीस अधीक्षक,महामार्ग परिक्षेत्र पुणे.

Scanned with CamScanner